जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ९८ दिनांक - ०७/०२/२०२४

खंडणी विरोधी पथक - २, गुन्हे शाखा,पुणे शहर

### देशी बनावटीचा १ कट्टा व १ जिवंत काडतुस बाळगणा-यास अटक

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेश कुमार यांनी गुन्हे शाखेला पुणे शहरामध्ये गुन्हेगारी कारवायांचा बिमोड करण्याचे निर्देश देवुन त्या अंतर्गत अग्निशस्त्रे बाळगणारे गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याच्या सुचना दिलेल्या होत्या.

त्यानुसार पोलीस निरीक्षक,खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखा,पुणे शहर प्रताप मानकर, यांचे देखरेखीखाली पथक माहिती काढीत असताना पोलीस अंमलदार सचिन अहीवळे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारे अग्निशस्त्र बाळगणारा विनोद अशोक चेडे वय २६ वर्ष रा.सर्व्हे नं.१६,भोपाळी बिल्डिंग फ्लॅट नं.२,आंबेगाव पठार पुणे यास हॉटेल एच.एम.आर.रॉयल इन चे गेटजवळ कात्रज घाटाकडे जाणा-या रोडवर पुणे परिसरामध्ये सापळा रचून त्यास पकडून त्याचे ताब्यातून देशी बनावटीचे १ पिस्टल व १ जिवंत काडतूस, एक मारुती स्वीफ्ट कार असा किं.रु. ३,३५,५००/- चा माल जप्त करून त्याचेविरुध्द भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे २ श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर, पो.उप निरी. श्रीकांत चव्हाण, मोहनदास जाधव व पोलीस अंमलदार सचिन अहिवळे, प्रदिप शितोळे,विजय गुरव,राहुल उत्तरकर,सुधीर इंगळे,पवन भोसले,संग्राम शिनगारे,सैदोबा भोजराव,शंकर संपते,चेतन आपटे,अमोल पिलाणे,किशोर बर्गे,चेतन शिरोळकर,आशा कोळेकर यांनी केलेली आहे.